!! श्री गणेशाय नमः !!
!! श्री लक्ष्मीकांत प्रसन्न !!
!! श्री बंदिजाईनी प्रसन्न !!

# समवेत




# नोव्हेबर २०२१

Designed & Printed by - Vidya Mudran Mandir, Vidyadhar Keshav Kelkar, ☎ 9757142636 / 8369093247

# नामाचे महत्व . . .



श्रीसद्‌गुरवे नमः

आयुष्य म्हटलं की आपलं आयुष्य विविधतेने नटलेलं आहे, रंगलेलं आहेच, या नटलेल्या–रंगलेल्या आयुष्यात आपणही आपल्या कौशल्याने विविधता आणू शकतो आपल्या कलागुणांनी. चांगले दिवस–वाईट दिवस येणार आनंद देवून, काही गोष्टी

शिकवून जाणार, शहाणंही करणार. आपल्या आयुष्यात अडचणी–संकटे येणार, येवू द्यात अडचणी–संकट. या अडचणी– संकटांमुळे तर सुखां–आनंदाची किंमत समजून येते. श्रीसद्‌गुरु म्हणतात, “ अडचणींच्या वेळी सर्वात चांगला आधार म्हणजे तुमचा श्रीसद्‌गुरुंवरचा विश्वास, जो तुमच्या कानात हळूच सांगत असतो सर्व चांगलं होईल“. श्रीसद्‌गुरु आपल्याला जे काही सांगत आहेत ते एक सत्य वचन आहे, खरं आहे श्रीसद्‌गुरुरायावरील आपला विश्वास हाच आपला खरा आधार आहे. हाच विश्वास आपल्या कानात हळूच सांगत असतो की, काळजी करु नकोस, सर्वकाही चांगलं होईल नी हेच विचार आपल्या मनात सतत येतं असतात.

आपल्या हातून झालेल्या चांगल्या–वाईट कृतींमुळे कर्मबंधने तयार होऊन अडचणी–संकटं येत असतात, काही काळानंतर जशी येतात तशी निघूनही जातात, पण आलेली ही अडचणी–संकटं इतकी तीव्र होवून बेजार करतात की, जीव नकोसा होवून जातो. याच काळात श्रीसद्‌गुरु आपल्याला आधार देत असतात, आधाराचे चार शब्द सांगत असतात, सर्वकाही चांगलं होईल, तू नाम घे, नामात रहा हे त्यांचे प्रेमाचे बोल आपल्यासाठी महत्वाचं कार्य करीत असतात, श्रीसद्‌गुरु आपल्या पाठीशी आहेत, हा श्रीसद्‌गुरुंवरील असलेला आपला पूर्ण विश्वास आपल्याला अडचणींतून–संकटांतून बाहेर काढत असतो. विश्वास कसा कार्य करीत असतो, याविषयीचे उदाहरणच आपल्याला अधिक स्पष्ट करुनच सांगेल. आपल्याला बरं नाही, तापाची कणकण वाटल्याने आपण डॉक्टरांकडे जातो. ते तपासून आपल्याला औषधं देतात. औषध साधंच दिलेलं असते, विशेष काही झालेलं नसतंही. तपासणी वेळी डॉक्टर जो संवाद साधतात, तो संवाद आणि त्यांच्यावरील विश्वास आपल्याला बरं करत असतो.

आपल्या अडचणी–संकटांच्या काळात अन्य कुणीही मदतीसाठी येणार नाहीत. विचारपूस करुन निघून जातील. मात्र, श्रीसद्गुरु कधीच आपल्याला दूर करणार नाहीत. हिताच्या चार गोष्टी सांगून, अडचणींतून, संकटांतून पूर्णतः बाहेर काढतील, कारण, श्रीसद्गुरु आपल्यासोबत अनंत जन्मांपासून आहेत. ते आपल्याला कधीही सोडून कुठेही जातं नाही. आपणच त्यांना सोडून अन्यत्र जातो नी नको त्या गोष्टी करुन अडचणी–संकटांना आपल्या आयुष्यात आमंत्रित करीत असतो हे वेगळे सांगायला नको. श्रीसद्गुरु आपल्याला या येणा–या अडचणी–संकटांतून बाहेर काढतांना खूप काही शिकवित असतात. ते जे आपल्याला वेळोवेळी शिकवितात, ते आपल्या चांगलं लक्षात रहातं. वेळच्या वेळी नाम घ्यायला हवं, नामाला विसरुन कदापि चालणार नाही. चला तर मग नामाला कंटाळा येईपर्यंत नाम घेवू या.

जय सांईराम.

**श्री. प्रदीप नरहरि केळकर,**

डोंबिवली, १३१२२०२०.

# दिवाळी . . .



स्वच्छ सुंदर लखलखीत घरा
नवा कंदील नव्या माळा
नव्या पणत्या नव्या पताका
नवा साज माझ्या दारा
माझी दिवाळी....



जुनाच फूटपाथ जुनाच रस्ता
जुनाच आडोसा अन् जुन्याच खस्ता
फाटका कंदील अन् अर्धमेली माळ
अंधाराचं राज्य तिन्ही त्रिकाळ
त्यांची दिवाळी....

नवे कपडे नवे दागिने
अभ्यंग तेल अन् सुगंधी उटणे
फराळाचे अगणित डबे
ढीगभर पैष्यांचे मूठभर फटाके
माझी दिवाळी....





जुन्या कपड्यांना नवी ठिगळे
डोळ्यातील आसवे हेच दागिने
कसले तेल अन् कुठले उटणे
माहीतच नसतात फराळ अन् फटाके
त्यांची दिवाळी...

आप्तजनांच्या गाठीभेटी
भेटवस्तूंना उधाण येती
पक्वान्नांच्या अंगती पंगती
हास्यानंदाने बहरून जाती
माझी दिवाळी...





कोण आप्त अन् कुठल्या भेटी
त्यांना सारखीच दसरा अन् दिवाळी
उकिरड्यावर फेकलेल्या पक्वानांनी
पोटाची ते खळगी भरती
त्यांची दिवाळी ...

नको भेटवस्तू नको पंगती
नको माळा अन् नको पणती
नवी नकोच चालेल जुनी
मूठभर नको द्यावे चिमुटभरूनी
घासा मधला घास भरवूनी
साजरी करूया आपली दिवाळी..
साजरी करूया आपली दिवाळी..



**प्रणिता स्वप्नील केळकर**
ठाणे

Designed & Printed by - Vidya Mudran Mandir, Vidyadhar Keshav Kelkar, ☎ 9757142636 / 8369093247